सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 225 ठ. क्र. 238 दि. 20/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



म.न.पा. प्रशासकीय इमारतीवर सोलार रुफ टॉप सिस्टीम (१०० kW) बसविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. - र.रु. ८२,५०,०००/- यांस मा. स्थापत्य समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २९-८-१६ टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २६७, दि. २३-९-१६ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

अपारंपारिक उर्जा या बजेट हेडअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी करणेत यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २२६ ठ. क्र. २३५
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



जुळे सोलापूर एम.बी.आर.ची १०१६ मि.मि. व्यासाचे नव्याने टाकलेल्या लोखंडी पाईप लाईनला आसरा रेल्वे क्रॉसिंग येथे रेल्वे क्रॉसिंग करुन जोडणी करुन त्याद्वारे पाणी पुरवठा करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. १/२०१६-१७ र.रु. ३५,३८,७४०/- यांस व पूर्वगणनपत्रकास व याकामी येणारा खर्च हा UIDSSMT योजने अंतर्गतच्या उपलब्ध तरतूदीतून करणेस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १२-९-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २६८, दि. २३-९-१६ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

जुळे सोलापूर ते आसरा पुलापर्यंत रेल्वेच्या पाईप लाईनसाठी भाडे रेल्वेच्या नियमाप्रमाणे त्यांचेकडून वसूल करण्याची कार्यवाही ठेवावी. तसेच मोदी चर्च समोर रेल्वेचा मधला रस्ता हा महानगरपालिकेच्या ताब्यात असून, तो रस्ता बंद केल्याचे दिसून येत आहे. तो सर्वासाठी खुला करणेबाबतची कार्यवाही ठेवावी. सदरचा रस्ता हा महानगरपालिकेचा डी.पी. रस्ता असल्यामुळे पाईप लाईनचे काम पूर्ण करावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 336 ठ. क्र. 236
दि. 10/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कल्पना नगर, अक्कलकोट रोड येथील अंतर्गत मलनित्सःरण निचरा होण्यासाठी ड्रेनेज लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १७/२०१६-१७ र.रु. १९,५९,९००/- इतकेचे तयार केले असून सदरकामी बजेट तरतूद होणेस व पूर्वगणनपत्रकास मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २३-९-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज२२८ ठ. क्र. २३७
दि. २०।९।२१।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



१४ वे वित्त आयोग अनुदान रक्कमेतून महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजना व प्राथमिक सोयी सुविधा पुरविणे विशेष अनुदान करिता मनपा हिस्सा भरणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, प्रस्तावातील नमूद बाबीचा विचार करुन सोलापूर महानगरपालिकेस संदर्भ क्र. १ अन्वये १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदान र.रु. २६,३१,७३,११६/- च्या ५० टक्के इतक्या रक्कमेतून १४ वे वित्त आयोग विनियोग कार्यपध्दत नुसार र.रु. ६.०० कोटी मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा योजनेकरिता मनपा हिस्सा भरणे व उर्वरीत रक्कम महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) मलनित्सारण व्यवस्था प्रकल्प पूर्ण करणेसाठी करावा लागणार असून अतिरिक्त खर्च करिता र.रु. ७,३१,७३,११६/- इतकी सदर योजनेच्या खात्यात जमा करणे ईष्ट होईल. तसेच मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा विशेष अनुदान र.रु. १०.०० कोटी करिता मनपा हिस्सा र.रु. ६.०० कोटी १४ व्या वित्त आयोग अनुदानातून रक्कम वर्ग करणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.मनपा सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-९-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच यापूर्वीच्या यादीमध्ये सुचविलेली कामे झालेली असल्यास ती वगळणेत यावी. आणि शिल्लक राहणा-या रक्कमेतून खालीलप्रमाणे सुचविण्यात आलेली कामे व त्या पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | कारले घर ते माशाळे घरापर्यंत रस्ता करणे | १०.०० |
| २. | शाब्दी घर ते मोतीवाले घरापर्यंत रस्ता करणे | १०.०० |
| ३. | व्यवहारे घर ते अधटराव घरापर्यंत रस्ते करणे तसेच विविध परिसरात रस्ते करणे | १६.०० |
| ४. | सिंधू विहार येथे अंतर्गत रस्ते करणे | १५.०० |
| ५. | श्रीनगर येथे अंतर्गत रस्ते करणे | १५.०० |

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका